सहकार न्यायालयातील न्यायाधिशांना दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिका-यांप्रमाणे न्या.शेट्टी आयोग व न्या. पद्मनाभन समितीच्या शिफारशीनुसार वेतन निश्चिती करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग
शासन निर्णय क्रमांक-न्यायाप्र-२०१६/प्र.क्र.२७८/५-स
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक - २७ नोव्हेंबर, २०१७

वाचा -

१. शासन निर्णय, विधी व न्याय विभाग क्रमांक एचसीटी-३००३/(६२)-तीन, दि.०४.०७.२००३.
२. शासन निर्णय क्रमांक राजस १७०८/प्र.क्र.४८९/५-स,दिनांक १८/३/२०१०.
३. शासन निर्णय, विधी व न्याय विभाग क्रमांक एचसीटी-२००९/प्र.क्र.१४१/का-तीन, दि.२२.१०.२०१०.
४. शासन निर्णय, विधी व न्याय विभाग क्रमांक एचसीटी-२००९/प्र.क्र.१४१/का-तीन, दि.५.०१.२०११
५. शासन शुध्दीपत्रक, विधी व न्याय विभाग क्रमांक -एचसीटी-२००९/प्र.क्र.१४१/का-तीन, दि.३०.०३.२०११
६. शासन परिपत्रक, विधी व न्याय विभाग क्रमांक -एचसीटी-२०११/प्र.क्र.१००/का-३, दि.२५.०७.२०११
७. शासन निर्णय क्रमांक राजस १५११/प्र.क्र.२०३/५-स,दिनांक २६/८/२०११.

प्रस्तावना :

मा.सर्वोच्च न्यायालयाने एस.एल.पी.१०२२/(सी)-१९८९ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार नेमलेल्या मा.न्यायमूर्ती पद्मनाभन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने (दुसरा राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोग) जुलै २००९ मध्ये अहवाल दिला असून मा. सर्वोच्च न्यायालयाने सदरील आयोगाच्या शिफारशी दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना लागू करण्याचे निर्देश सर्व राज्य शासनांना दिले आहेत. त्यानुसार विधी व न्याय विभागाने दि.२२/१०/२०१० च्या शासन निर्णयान्वये दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना न्या. पद्मनाभन समितीच्या शिफारशीप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू केल्या असून अन्य मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखालील न्यायिक अधिकाऱ्यांसाठी होणाऱ्या खर्चाची तरतूद स्वतंत्ररित्या करावी, असे शासन निर्णयामध्ये नमूद केलेले आहे.

शासन निर्णय,विधी व न्याय विभाग दि.४/७/२००३ अन्वये दुय्यम न्यायालयातील सेवेत कार्यरत न्यायिक अधिकाऱ्यांना दि.१/७/१९९६पासून न्या.शेट्टी आयोगानुसार तर शासन निर्णय, विधी व न्याय विभाग दि.२२/१०/२०१० नुसार दि.१/१/२००६ पासून न्या. पद्मनाभन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे.

शासन निर्णय, विधी व न्याय विभाग दि.५/१/२०११ च्या आदेशानुसार पद्मनाभन समितीच्या शिफारशीनुसार न्यायिक अधिकाऱ्यांना वेतनविषयक लाभ लागू करण्यात आले असून सदर आदेश दि.१/१/२००६ किंवा त्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या न्यायिक अधिकाऱ्यांना लागू करण्यात आले आहेत. तद्नंतर विधी व न्याय विभागाच्या दि.३०/३/२०११ च्या शासन शुध्दीपत्रकाद्वारे दि.१/१/२००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या न्यायिक अधिकाऱ्यांना पद्मनाभन समितीच्या वेतन विषयक शिफारशी निवृत्ती वेतनासाठी लागू करण्यात आल्या आहेत. तसेच दि.२५/७/२०११ व शासन शुध्दीपत्रक विधी व न्याय

विभाग,दि.३०/३/२०११ नुसार निवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतन परिगणित करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग क्रमांक राजस १५११/प्र.क्र.२०३/५-स, दिनांक २६/८/२०११ अन्वये सहकार न्यायालयाच्या न्यायाधिशपदी सरळसेवेने नियुक्त झालेल्या न्यायाधिशांना दि.१/९/१९९८ पासून शेट्टी आयोगाच्या शिफारशीनुसार व दि.१/१/२००६ पासून पद्मनाभन समितीच्या शिफारशींप्रमाणे वेतननिश्चितीचे लाभ लागू करण्यात आले आहेत.

रिट पिटीशन क्र.२९४६/२०१६, श्रीमती हंसा दादाराव इंगोले विरुध्द महाराष्ट्र शासन या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२७/९/२०१६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार दिवंगत श्री.दादाराव इंगोले, तत्कालीन सदस्य, महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय यांना शासन परिपत्रक, विधी व न्याय विभाग, दि.२५/७/२०११ नुसार दि.१/९/१९९८ पासून न्यायमूर्ती शेट्टी आयोगाच्या शिफारशीनुसार वेतन निश्चितीचे लाभ देणे व दि.१/१/२००६ पासून न्यायमूर्ती पद्मनाभन आयोगाच्या शिफारशीनुसार सेवानिवृत्ती वेतनाचा लाभ कुटुंब निवृत्तीवेतनासाठी देण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार महाराष्ट्र राज्य सहकारी न्यायालयातील न्यायाधिशांना दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिका-यांप्रमाणेच न्या. शेट्टी आयोग व न्या. पद्मनाभन समितीच्या शिफारशी विधी व न्याय विभागाने निर्गमित केलेल्या संदर्भाधीन दिनांक ५/१/२०११ व दिनांक ३०/३/२०११ च्या आदेशांच्या प्रभावाने लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

<u>शासन निर्णय</u> :

शासन निर्णय विधी व न्याय विभाग दि.२५/७/२०११ नुसार तसेच शासन शुध्दीपत्रक विधी व न्याय विभाग दि.३०/३/२०११ नुसार दि.१/१/२००६ रोजी अथवा तद्नंतर सेवानिवृत्त झालेल्या दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना न्यायमूर्ती पद्मनाभन समितीने केलेल्या शिफारशीनुसार सेवानिवृत्ती वेतन देण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार सहकार न्यायालयातील दि.१/९/१९९८ ते दि.१/१/२००६ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या न्यायाधिशांना देखील न्यायमूर्ती पद्मनाभन समितीने केलेल्या शिफारशीनुसार वेतननिश्चितीचे लाभ अनुज्ञेय करण्यात येत आहेत. दि.१/९/१९९८ ते दि.१/१/२००६ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या न्यायधिशांना थकबाकीची रक्कम देण्याबाबत विधी व न्याय विभागाच्या दि.५/१/२०११ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी तसेच संदर्भाधीन अ.क्र.७ मधील शासन निर्णय दि.२६/८/२०११ मधील इतर अनुषंगिक अटी व शर्ती कायम राहतील.

सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून संबंधितांनी एक महिन्याच्या आत लेखी स्वरुपात विकल्प भरुन दयावेत.

यासाठी होणारा खर्च त्या- त्या वर्षाच्या मंजूर वित्तीय अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या, अनौ.सं.क्र.१७०/१७/सेवा-४, दि.२/९/२०१७ व अनौ.सं.क्र.४७५/१७/व्यय-२, दि.२/९/२०१७ , विधी व न्याय विभागाचे, क्रमांक-युओर १६/१७ दि.९/११/२०१७ अन्वये प्राप्त अभिप्रायास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२७१६२७३७८७०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Manjiri Ganeshbhushan Joshi

Digitally signed by Manjiri Ganeshbhushan Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=91b4708db2a52d675f7f30d81444f3844833dfc7c86d4244ee1075c97c713180, serialNumber=7d5731d128ab41d6a090557a2e9658b7382ac03af6e239ba66cc1cf9a6cf2f52, cn=Manjiri Ganeshbhushan Joshi
Date: 2017.11.27 16:31:53 +05'30'

(मं.ग.जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग

प्रति,

१. महाप्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई (पत्राने)
२. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय, मुंबई
३. सदस्य, महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद
४. सर्व सहकारी न्यायालये, द्वारा-प्रबंधक, महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय, मुंबई
५. सर्व मा.विधानसभा / विधानपरिषद सदस्य
६. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन)
८. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखापरीक्षा व लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१०. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
११. जिल्हा कोषागार अधिकारी संबधित
१२. वित्त विभाग (सेवा-९/सेवा-४), मंत्रालय, मुंबई
१३. प्रधान सचिव (व्यय/वित्त विभाग), मंत्रालय
१४. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. अपर मुख्य सचिव (सहकार), मंत्रालय, मुंबई
१६. कक्ष अधिकारी (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. निवड नस्ती.